म.कौ.हिं.सं.का. क्र. २८/२०२५

वैशाली वि. गणेश

**निशाणी क्रं. २० चा भाग**

**<u>निशाणी क्र.२७ वरील आदेशावरुन रद्दबातल केलेला उलटतपास नाही केलेल्या आदेशावरुन अर्जदाराचा उलटतपास गैरअर्जदाराचे विधीज्ञ श्री. एस.सी.झाल्टे यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>**

माझे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झालेले आहे. लग्नापुर्वी माझी भावी नव-याविषयी तो नोकरीवाला असावा, त्याला कोणतेही व्यसन नसावे आणि त्याने चांगले वागावे अशी अपेक्षा होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीने मला चांगले नांदविले म्हणुन मला दोन मुले झालीत. साक्षीदार सांगते की, तीन वर्षापासुन हे प्रकरण घडले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आई-वडिलांनी जे दागदागिणे व भांडीकुंडी मला माझ्या लग्नात दिले होते, त्याबद्दल मी कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे कोणताही ऐवज माझ्या आई-वडिलांनी मला किंवा गैरअर्जदाराला लग्नात दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आई-वडीलांनी गैरअर्जदारास यास विवाहामध्ये कपडे-लत्ते आणि सोन्याची अंगठी घेण्यासाठी एक लाख रुपये नगदी वरदक्षिणा दिलेबाबत माझेकडे कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ते खोटे नमुद केले आहे.

२. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीचे सविता संजय बोराडे, रा.मंगरुळ या महिलेशी अनैतिक संबंध असल्यामुळे तो मला घराच्या बाहेर काढुन देत होता याबाबत मी पोलीस स्टेशनला तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणताही घटना घडली नाही म्हणुन मी पोलीस स्टेशनला तक्रार केली नाही. माझा पती डयुटीला गेल्यानंतर, घरी येत नव्हता, तिकडेच मुक्कामी राहत होता, त्यामुळे मला संशय आला म्हणुन मी त्याचे मोबाईलवरील व्हॉटस्अप तपासला. या घटनेची तारीख मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडलेली नाही.

३. मी, सविता संजय बोराडे या महिलेस स्वतः जाऊन भेटले नाही. हे म्हणणे

खरे नाही की, गैरअर्जदाराने सविता संजय बोराडे नावाची कोणतीही महिला ठेवलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जे छायाचित्रे अभिलेखावर दाखल केलेली आहेत त्याची डिटेल्स मला माहित नाही. मी सदर छायाचित्रे माझे मावसा कौतिकराव देवराव मोरे यांचे मोबाईल मध्ये काढलेले होते. माझा मावसाचा मोबाईल क्रमांक माझे तोंडीपाट नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा पती रात्री–बेरात्री घरी यायचा, माझेसोबत भांडण करायचा आणि मला मारहाण करुन घराच्या बाहेर काढायचा या घटनांचा तारीखवार तपशिल मी दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडली नाही म्हणुन मी तपशिल नमुद केला नाही. माझा पती सविता संजय बोराडे हिच्यासोबत व्हॉटस्अप वर बोलत होता ही बाब मला त्याचे मोबाईवरील व्हॉटस्अप चेक केले तेव्हा दि.०६ जुन २०२२ रोजी समजले. मी त्याबाईला जावुन भेटले नाही. साक्षीदारा सांगते की, गैरअर्जदार मला घराच्या बाहेर निघु देत नव्हता, त्यामुळे मी त्या बाईला कशी भेटायला जाऊ.

४. मी, जेथे राहते तेथे पुर्वेला– काटकर राहतात, पश्चिमेला–नवीन बांधकाम चालु आहे, उत्तरेला–जाधव यांचे घर व दक्षिणेला – सागरे मॅडम राहतात. हे म्हणणे खरे नाही की, मी या घटनेबद्दला आजुबाजुच्या लोकांशी बोलले नाही. साक्षीदार सांगते की, आमची भांडणे जेव्हा होत होती, तेव्हा तेच लोक येत होते.

५. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीचे आणि माझे भांडण झाले तेव्हा मी, पोलीसांना फोन करुन बोलविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पती विरुध्द पोलीस स्टेशनला दाखल केलेल्या केसबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सविता संजय बोराडे नावाच्या कोणत्याही महिलेसोबत माझे पतीचे अनैतिक संबंध आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, काल्पनीक सविता संजय बोराडे नावाच्या महिलेल्या अर्जात नमुद केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीचे आजही माझ्यावर प्रेम आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आजही गैरअर्जदाराच्या घरात राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा पती माझी आणि मुलांची राहण्याची, खाण्या–पिण्याची सर्व व्यवस्था करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार आजही मला व माझ्या मुलांच्या सर्व व्यवस्था करतात. मी माझ्या पतीसोबत राहण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे

नाही की, माझे पतीने माझ्यावर कोणताही कौटुंबिक अत्याचार केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी केवळ संशयावरुन सदरची केस केलेली आहे. हे मी सांगु शकत नाही मला आणि माझ्या मुलांना मंजुर केलेली वीस हजार रुपये अंतरीम खावटी पुरेशी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकच्या गैरसमजुतीतुन खोटी केस केली, खोटे शपथपत्र दाखल केले आणि आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

Digitally signed by KAILAS TRYAMBAK ADHAYKE
Date: 2026.04.20 17:23:51 +0530

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

(कैलास त्र्यं. अढायके)

दिनांक – २०/०४/२०२६

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, सिल्लोड.